# तहानलेल्या गावातील महिलांनी पुढाकार घेवून दिलेल्या झुंजीला आलेले यश

घुबड हेटी (वरध) हे राळेगाव तालुक्यापासून 30 किलोमीटर वर तर वरध गट ग्रामपांच्यायत गावा पासून ४ किमी अंतरावर वसलेले गाव. गावामध्ये 66 कुटुंबे व  230 लोकसंख्या असलेले छोटस गाव. 100 % कोलाम आदिवासी वस्तीचे गाव. या गावात चार कुटुंब सोडले तर इतर सर्व कुटुंबे कोरडवाहू अल्प व अत्यल्प शेतकरी. तीन ते  चार एकर शेती असल्याने आपल्या शेतातील कामे आटोपली कि दुसऱ्यां गावी मजुरी करिता जावेच लागते. कारण गावात मजुरी मिळत नाही. शेती आणि शेतमजुरी हेच जगण्याचे साधन.

या गावात एक विहीर आहे जी पावसाच्या पाण्याने भरली कि या विहिरीचे पाणी मार्च महिन्यापर्यंत पुरते. याच पाण्याचा  पिण्याकरिता व  बाहेर वापरायला वापर होतो. मात्र मार्च महिन्यानंतर या विहिरीचे पाणी संपले कि महिला आजूबाजूच्या शेतावर पाण्याकरिता एक-दोन किलो मीटर जाऊन पाणी आणतात. दरवर्षी गावात पाण्याची हीच परिस्थिती.

वर्षानुवर्षापासून असलेली परिस्थिती बदलण्याकरिता कोणी समोर येऊन ठोस उपाय करत नव्हते. महिलांना पाण्याचा त्रास असल्याने महिला ओरड करत होत्या पण त्याचं तितकस कुणी ऐकूण घेत नव्हते.

यावर्षी मार्च महिन्यातच विहिरीचे पाणी संपले. गावात याच वर्षात 10 शासकीय घरकुल मंजूर झाल्याने ते बांधायला पाणीच नाही. प्यायलाच पाणी नाही तर घर बांधायला कुठून पाणी मिळणार. घराचे काम पूर्ण केले नाही तर पुढचा हप्ता मिळणार नाही असा ग्राम पंचायतच्या सचिवा कडून तगादा असल्याने गावातील एका कुटुंबाने विकत पाणी आणून घरकुलाचे काम सुरु केले. गावातील आठ दहा युवक ग्रामपंचायत मध्ये जावून सरपंच श्री. रोठे यांना भेटून पाण्याची समस्या मांडली. त्यांनी ते ऐकूण घेवून वरून प्रयत्न सुरु आहे मी तस बोललो आहे असे उत्तर देऊन परत पाठविले. दुसऱ्यां दिवशी ग्रामसेवक गावात आला. ग्रामसेवकाला गावातील महिला एकत्र येवून पाण्याबाबत काहीतरी करा असे कळवळून सांगत होत्या, पण त्याने सांगितले गावात पाणीच नाही तर आम्ही काय करायचे? तुमच्या गावातील जमीनीत पाणी लागत नाही? ट्यांकर हि मिळत नाही. आम्ही प्रयत्न करतो असे सांगून तो निघून गेला.

याच काळात महिलांची बैठक घ्यायला गावात गेली असता महिला एकत्र आल्या आणि बैठकीत सर्व चिंतेत दिसत होत्या या सर्व महिलांना पाण्याची चिंता होती, लेकराची तहान

भागविण्याची काळजी होती. हि काळजी प्रत्येकीच्या डोळ्यात दिसत होती. एकत्र आल्यानंतर सार्वजणी एकाच विषयावर बोलायला लागल्या ताई आपल्या गावात पाणी नाही कस करायचं? कुणीच लक्ष देत नाही. पुरुष हि मनावर घेत नाही कस करायचं? पुढचे तीन महिने पाण्याशिवाय कस होईल? काहीही करू ताई आपल्या गावात पाणी आले पाहिजे. सर्व जणींच्या चेहऱ्यावरची चिंता बघून विचार आला, काय करायचे? याच बैठकीत ठरविले काहीतरी प्रयत्न करायलाच पाहिजे. निवडणूक तोंडावर आहे याचा फायदा घेऊन काहीतरी पाऊल उचलायला पाहिजे. असे ठरवून गावात सायंकाळी सर्व महिलांची चावडी समोर सभा घेऊन पाण्याचा प्रश्न कसा सोडवायचा यावर चर्चा केली. प्रश्न गावाचा असल्याने सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. तुम्ही सार्वजणी सहकार्य कराल तर नक्कीच प्रश्न सुटू शकेल. सर्व महिलांनी सहकार्य करण्याचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सर्व महिला एकत्र आल्या. मजुरीला कुणीच गेले नाही. सर्व मिळून पंचायत समिती राळेगाव येथे येऊन गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्याचे ठरले. येण्याकरिता थोडा खर्च होणार होता या खर्चाकरीता गावातील प्रत्येक कुटुंबाकडून 50/- रुपये वर्गणी गोळा करण्यात आली.

दि. 27.3.24 ला एक मोठी गाडी करून गावातून 40 महिला 12 युवक दुपारी 01 वाजता पंचायत समितीत एकत्र आले. एवढ्या मोठ्या संख्येने गावातील लोक आल्याने ज्याची त्याची नजर त्यांच्यावर होती. सर्वांच्या मनात प्रश्न होते कशाकरिता आले असतील? गावात काही झाले तर नाही ना? इथे आल्यवर ठरल्याप्रमाणे निवेदन लिहून घेतले. आमच्या गावातील वर्षानुवर्ष असलेला पाण्याचा प्रश्न सुटणार नाही तर आमच्या गावातील कुणीच मतदान करणार नाही. यावर्षी होणाऱ्या मतदानावर आम्ही सर्व घुबडहेटी वासी बहिष्कार टाकत आहोत. असे निवेदन लिहून मा. केशव पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती राळेगाव यांना दिले व सर्व जण मिळून त्यांना गावाची समस्या सांगायला लागले. एवढ्या वर्षाचा पाण्याचा प्रश्न असून तुम्ही काही उपाययोजना का करीत नाही? आम्ही मांणस नाही आहो काय? आम्हाला जगण्याचा अधिकार नाही काय? हे सर्व ऐकूण या गावाशी सबंधित ग्रामसेवकाला पंचायत समिती कार्यालयात बोलावून पाणी प्रश्नाची माहिती करून घेतली. आतापर्यंत या गावाचा प्रश्न का समोर मांडला नाही? काही उपाययोजना का केली नाही तर ग्रामसेवक गप्पच होता. गावातील महिलाही त्यना जाब विचारत होत्या किती वेळा तुम्हाला आम्ही बोललो पण तुम्ही लक्षच दिले नाही म्हणून इथपर्यंत यायची गरज पडली. आतातरी काही करता का इथेच बसू आम्ही? आज आघोळी केल्या नाही कि जेवण केले नाही आता काय करायचे? हे तुम्हीच

सांगा म्हणून तिथेच सार्वजणी कार्यालयातच बसून राहिल्या. थोड्या वेळाने श्री. पवार साहेबांनी आत बोलावून उद्या तुमच्या गावाला पाणी पाठवतो व विहिरीचे काम सुरु करू असे आश्वासन दिल्यानंतर महिला बाहेर आल्या.

इथेच थांबल्या नाही तर तहसील मध्ये जाऊनही तहसीलदार यानाही निवेदन देऊनच गावाकडे परतल्या. घरी गेल्यावर हि मनात चिंता होती खररच उद्या पाणी येईल काय? नाहीतर लोक म्हणतील काय झाल तिथे जाऊन? रात्र याच चितेत गेली. सकाळी उठल्यावर एकमेकीला हेच विचारणे सुरु होते पाणी येईल काय गावात? आणि बघता बघता सर्वच जणी एकत्र आल्या सर्वजणीच्या नजरा पाण्याच्या वाटेकडे लागल्या होत्या. आणि काय आनंद झाला सकाळी सात वाजता पाण्याचा  ट्यांकर गावात आला. काळजीचे रुपांतर आनंदात झाले. ट्यांकर गावात आला गावातल्या विहिरीत पाणी सोडायचे असे महिला सांगत होत्या. ट्यांकर विहिरीच्या दिशेने आला विहिरीत पाणी सोडले सर्वजणी आनदाने पाणी भरायला विहिरीवर आल्या. पाणी भरून घरची कामे आटोपत असतानाच साधारण दहा वाजता जेसीबी गावात आली आणि गावाजवळच्या कोरड्या तलावाकडे कडे जात असताना महिलानी हातचे काम सोडून त्या जेसीबी च्या मागे गेल्या आजही कुणीच मजुरीला गेल्या नाही. तलाव जवळ विहीर खोदायला सुरुवात झाली बघता बघता 10 फुट विहीर खाली गेली आणि पाहतो तर काय दहा फुटावर विहिरीला पाणी लागले. महिलांच्या आनंदाला पारावर उरला नाही गावातून सार्वजन येऊन पाणी पाहून सर्वच खुश झाले. आम्ही लढाई जिंकलो याचा अभिमान वाटला. पाण्याचा विहिरीचा फोटो काढून लगेच पाठवला.  ताई आपण जिंकलो विहिला पाणी लागले तुम्ही लवकर या असा फोनवरच जल्लोष झाला. गावात पुरुषांनी हि महिलांचे कौतुक केले तुम्ही हिम्मत करून तुमच्या ताई सोबत  गेल्या म्हणूनच आज गावात पाणी आले असे सर्वांचे मत होते. दुसऱ्या दिवशी महिलांच्या आग्रहाने गावात गेल्यावर सर्व जनी एकत्र येऊन ताई आपण जिंकलो एवढ्या वर्षात कोणी नाही केले ते आपण केले म्हणून सर्वजणी आनंद साजरा करू लागल्या होळीच्या दिवशी पाणी नाही म्हणून होळी खेळलो नाही आज आपण खेळू म्हणून सर्वजणी आनंदात होळी खेळल्या. वयस्कर महिला म्हणत होत्या ताई आम्ही पाण्याचा दुष्काळ पाहून म्हातारपण आल पण पाणी कोणीच गावात आणले नाही पण तुमच्या हिमतीने आम्ही हिम्मत केली व जिंकलो म्हणून खूप खुश झाल्या.

त्या दिवसापासून रोज दोन ट्यांकर पाणीगावात येत आहे. तीन दिवसा नंतर आणखी दोन जेसीबी मशीन गावात आल्या. व 40 फुट विहीर खोल खोदून झाली, पाणी भरपूर लागले. गावात पाणी आनण्या करिता पाईप लाईन चे काम सुरु झाले.

गावातील महिला चिकाटीने भिडल्या व एकमेकींच्या हिमतीने गावासाठी आशेचा किरण बनल्या व झुंज देऊन गावाचा पाण्याचा प्रश्न सोडविला...

संकलन

माधुरी खडसे

मोबाईल – ७०२०८०६१७९

| | |
|---|---|
|  |  |
| पंचायत समिती, राळेगाव येथे घुबड हेटी येथल महिला | मा. पवार सर, गटविकास अधिकारी पंचायत समिती |

| | |
|---|---|
| निवेदन देण्याकरिता एकत्र आल्या. | राळेगाव यांच्यासोबत पाण्याच्या समस्येविषयी चर्चा केली व निवेदन दिले. |

| | |
|---|---|
|  |  |
| गावात □□□ अआणून विहीर खांद्ण्यात आली. | अगदी दहा फुटावर पाणी लागले. विहीर खांद्ताना गावातील महिला पुरुष. |